**<u>मुंबई मेट्रो लाईन - ३ प्रकल्प-</u>**
**कुलाबा-वांद्रे-सिप्झ मार्गिकेवर मेट्रो रेल्वे प्रकल्प अंमलबजावणी करण्यास राज्य शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३११/प्र.क्र.१४९/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३ मार्च, २०१४.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३१०/४३१/प्र.क्र.५५/नवि-७, दिनांक १५ जून, २०१०.

**प्रस्तावना :**

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने १ ते २ कि.मी. अंतरावर जलद सार्वजनिक परिवहन व्यवस्था उपलब्ध करणे शक्य व्हावे म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १४६.५ कि.मी. लांबीच्या ९ मेट्रो मार्गिकांचा समावेश असलेला मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बृहत आराखडा (Master Plan) तयार केला आहे. त्यानुसार (१) मेट्रो लाईन-१ मार्गिका: वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (उन्नत मार्गिका), लांबी ११.४० की.मी. (२) मेट्रो लाईन-२ मार्गिका: चारकोप-बांद्रा-मानखुर्द (उन्नत मार्गिका), लांबी ३१.८७१ की.मी. व (३) मेट्रो लाईन-३ मार्गिका: कुलाबा-बांद्रा (अंशत; भुयारी व उन्नत मार्गिका), लांबी-२० कि.मी. या तीन मेट्रो रेल्वे मार्गिकांस शासनाने यापूर्वी मान्यता दिलेली आहे.

शासनाने यापूर्वी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता दिल्यानुसार मेट्रो मार्गिका क्र.३ : कुलाबा-बांद्रा (अंशत: भुयारी व उन्नत मार्गिका, लांबी-२० कि.मी.) हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी सहभागाने "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT)" या तत्वावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कार्यान्वित करण्याचे सुरवातीस प्रस्तावित होते. तथापि सदर प्रकल्पासाठी व्यवहार्यता तफावत निधी (VGF) ४० टक्के पेक्षा जास्त आवश्यक असल्याने केंद्र शासनाने सदर प्रस्ताव मंजूर करण्यास असमर्थता दर्शविली. तदनंतर सदर प्रकल्प मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित (MIAL) यांच्याही आर्थिक सहभागाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास जोडण्यासाठी मेट्रो लाईन-३ चे विस्तारीकरण करुन कुलाबा-वांद्रे-सिप्झ या पुर्णत: भुयारी मेट्रो मार्गिकेचा प्रकल्प अहवाल तयार करून जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे कर्ज सहाय्यातून घेण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. त्यानुषंगाने या प्रकल्पासाठी जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (JICA) यांच्याकडून एकूण रु.१३,२३५ कोटी अर्थ सहाय्य कर्जरुपाने मंजूर करण्यात आले असून केंद्रीय सार्वजनिक निवेश मंडळाच्या (पी.आय.बी.) मान्यतेनुसार दिनांक २७ जून, २०१३ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी काही अटी/शर्तीवर मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनाच्या केंद्रीय शहर विकास मंत्रालयाचे पत्र क्र. K-14011/36/2009-Metro/MRTS-II (Vol.III), Dated 18 July, 2013 अन्वये सदर प्रकल्पासाठी रु.२३,१३६ कोटी या प्रकल्प खर्चास मान्यता दिली असून राज्यस्तरीय/स्थानिक करांची एकूण रक्कम रु. ८०६ कोटी हिशोबात घेतल्यास सदर प्रकल्पास रु २३,९४२ कोटी खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून अपेक्षित सहाय्य देण्यासाठी सदर प्रकल्पास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात सर्वंकष विचारांती संदर्भाधिन शासन निर्णय अधिक्रमित करुन शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

मुंबई मेट्रो लाईन-३ या मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत "कुलाबा-वांद्रे-सिप्झ" या पुर्णत: भुयारी मेट्रो मार्गिकेच्या प्रकल्पास सोबतच्या **परिशिष्ट-१** मधील तपशिलानुसार पुढील प्रमाणे राज्य शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. "मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड" या यापूर्वी स्थापन केलेल्या कंपनीचे मेट्रो लाईन-३ प्रकल्पासाठी केंद्र शासनाचा व राज्य शासनाचा प्रत्येकी ५०% समभाग असलेल्या संयुक्त मालकीच्या "मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड" या विशेष हेतू वाहन (SPV) कंपनी मध्ये रुपांतर करुन सोबतच्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केल्याप्रमाणे विशेष हेतू वाहन (SPV) कंपनी स्थापन करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पासाठी सोबतच्या **परिशिष्ट-३** मध्ये नमूद केल्याप्रमाणे निधी उभारणी स्वरुपास मान्यता देण्यात येत आहे व जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (JICA) यांच्याकडून कर्ज घेण्यासाठी केंद्र सरकार, जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या SPV कंपनीला प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. सदर प्रकल्पासाठी जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (JICA) यांच्याकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या SPV ची राहील. सदर SPV कडून कर्ज परतफेडीत कसूर झाल्यास कर्ज परतफेडीचे दायित्व राज्य शासनाच्या वतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेवर राहील.

४. सदर कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो रेल्वे मार्गिकेसाठी सोबतच्या **परिशिष्ट-४** मध्ये नमूद केल्याप्रमाणे संकल्पित प्रवासी भाडेदरास मान्यता देण्यात येत आहे.

५. सोबतच्या **परिशिष्ट-५** मध्ये नमूद केल्याप्रमाणे समर्पित "नागरी परिवहन निधी" उभारणीच्या ढाचास शासनाची तत्वत: मान्यता असून त्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर समर्पित "नागरी परिवहन निधी" स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

६. मुंबई महानगरपालिकेस लागू असलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये सोबतच्या **परिशिष्ट-५ परिच्छेद क्रमांक- III** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास शासनाने तत्वत: मंजूरी दिली असून अधिनियमात सदर तरतूदी समाविष्ट करण्यासाठी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने विधेयकाचा मसुदा तयार करुन पुढील अधिवेशनात विधीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

७. सदर प्रकल्पाच्या प्रकल्प बांधकामादरम्यान चलन दर, केंद्रीय कर व शुल्कांमध्ये होणारे चढ-उतार, यामुळे प्रकल्प खर्चात होणारी वाढ केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामध्ये समप्रमाणात विभागली जाणार आहे. सबब, राज्यशासनाच्या हिश्श्याचा हा वाढीव खर्च तसेच भाववाढ (Escalation), प्रकल्पातील बदल, विलंब व इतर आवश्यक बाबींमुळे प्रकल्प खर्चात होणारी वाढ याचा सर्व खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करणे आवश्यक राहील.

८. सदर मेट्रो प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या विविध कर/शुल्काच्या ५०% हिश्श्याकरीता व सदर प्रकल्पासाठी आवश्यक खाजगी जमिनीच्या संपादनाकरीता तसेच पुनर्वसन व पुर्नवसाहत यावरील खर्चासाठी राज्य शासनामार्फत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या SPV कंपनीला एकूण रु. १६१५.१ कोटी बिनव्याजी दुय्यम कर्ज तसेच सदर प्रकल्पावर लागू होणाऱ्या राज्यशासनाच्या तसेच स्थानिक करांपोटी राज्य शासनातर्फे सदर SPV कंपनीला आणखी रुपये ८०६ कोटीचे बिनव्याजी दुय्यम कर्ज देण्यास शासनाची मान्यता असून यासंदर्भातील पुढील आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करुन संबंधित विभागाकडून स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

९. सदर प्रकल्पाठी केंद्र शासन व राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या बिनव्याजी दुय्यम कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या SPV ची राहील सदर SPV कडून कर्ज परतफेडीत कसूर झाल्यास कर्ज परतफेडीचे दायित्व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेवर राहील.

१०. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभाल आगारासाठी आरे दुग्ध वसाहत, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडलगतच्या ३० हेक्टर जमीनीच्या वापरात आवश्यक ते बदल करुन ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यास व सदर प्राधिकरणाकडे प्राप्त होणारी सदर जमीन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या SPV कंपनीकडे वर्ग करण्यास तसेच आरे येथील मेट्रो कार डेपोलगतची ३ हेक्टर अतिरिक्त जमीन प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवाशी/वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेशविकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरित करण्यास शासनाची मान्यता असून यासंदर्भातील आदेश स्वतंत्रपणे संबंधित विभागाकडून निर्गमित करण्यात येतील.

११. शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यास तसेच सदर प्राधिकरणाकडे प्राप्त होणारी सदर जमीन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या SPV कंपनीकडे वर्ग करण्यासही शासनाची मान्यता असून यासंदर्भातील आदेश स्वतंत्रपणे संबंधित विभागाकडून निर्गमित करण्यात येतील.

१२. सदर प्रकल्पालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी शासनाची मान्यता असून यादृष्टीने संबंधित विभागांनी

सदर मोकळया जागा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या SPV कंपनीला त्यांच्या विनंतीवरुन अविलंब सुपुर्द करण्याची कार्यवाही करावी.

१३. सदर प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांसाठी आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी केंद्रीय मेट्रो रेल्वे अधिनियम/मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६/प्रचलित भूसंपादन अधिनियमांतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४. मेट्रो रेल्वे स्थानक व कारडेपोच्या जागेचे व्यावसायिक वापरास शासनाची मान्यता असून त्यानुसार प्रचलित विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून सदर जमीनींचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या SPV कंपनीला राहतील.

१५. सदर प्रकल्पांतर्गतच्या प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन व पुनर्वसाहत जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (JICA) यांनी सहमती दर्शविल्याप्रमाणे "मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP-R & R Policy)" नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

१६. कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो रेल्वे मार्गिका हा प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.२०५/१४४४ दिनांक २३.१०.२०१३ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.५४५/व्यय-३, दिनांक १३.०१.२०१४ अन्वये प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

3/3/2014

(मनु कुमार श्रीवास्तव)
प्रधान सचिव नगर विकास (न.वि.-१),

प्रति,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (पदुम), कृषी, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
प्रधान सचिव (ऊर्जा) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
प्रधान सचिव गृहनिर्माण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
प्रधान सचिव पर्यावरण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
व्यवस्थापकीय संचालक, मंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रायव्हेट लिमिटेड.
विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
पोलिस आयुक्त, मुंबई.
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, वरळी, मुंबई.
जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगरे, मुंबई.
सह पोलिस आयुक्त वाहतूक, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई.
महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, (बेस्ट), मुंबई.
सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
कार्यासन अधिकारी (नवि-२१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (नवि-७).

METROLIN-3GR03032014

## परिशिष्ट-१

### तक्ता-अ

### मुंबई मेट्रो लाईन-३ - कुलाबा-वांद्रे -सिप्झ (संपूर्णतः भुयारी) मेट्रो रेल्वे मार्गिकेचा तपशील

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | स्टॅन्डर्ड गेज | १४३५ मी.मी. |
| २ | मार्गाची लांबी | ३३.५ कि.मी |
| ३ | स्थानके | २७ |
| ४ | गाडयांचे वेळापत्रक | दर ३/२.५ मिनिटांनी |
| ५ | फलाटाची लांबी | १८५ मी. (८ डब्यांच्या गाडयांकरीता) |
| ६ | कार डेपो | आरे दुध वसाहत- ३० हेक्टर |
| ७ | जमिनीखालील मेट्रो मार्गाची खोली | १५-२० मी. (सरासरी) |
| ८ | एकूण लागणारी जमिन (अंदाजित) | ४२.०० हेक्टर (३० हेक्टर आरे डेपो व १२ हेक्टर स्थानक सुविधा करिता)* |
| ९ | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | २०१४-१५ ते २०२०-२१ (सहा वर्षे) |
| १० | EIRR (Economic Internal Rate Of Return) | १७.९३% |
| ११ | FIRR (Financial Internal Rate Of Return) | २.१७% |
| १२ | प्रवासी संख्येचा आगाऊ अंदाज | सन २०२१ - संख्या- १३ लाख प्रवासी प्रति दिन<br>सन २०२५- संख्या- १४ लाख प्रवासी प्रति दिन<br>सन २०३१- संख्या- १७ लाख प्रवासी प्रति दिन |
| १३ | प्रवासी क्षमता | ६ डब्यांची गाडी -- १७९२ प्रवासी<br>८ डब्यांची गाडी -- २४०६ प्रवासी |
| १४ | प्रति ताशी प्रति दिशा प्रवासी संख्या (गर्दीच्यावेळी) (PHPDT) | सन २०२१- संख्या- ३९,००० PHPDT<br>सन २०३१- संख्या- ४२,००० PHPDT |

(***टीप**- सदर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकाम कालावधीच्या दरम्यान वरील जमिनीच्या क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.)

### तक्ता-ब

### केंद्र शासनाच्या मान्यतेप्रमाणे प्रकल्प किंमत

| अ. क्र. | तपशिल | रुपये कोटीत |
|---|---|---|
| १ | स्थापत्य कामे, स्थानके, विद्युत व सिग्नलिंग, भुयारी मार्ग, मेट्रो मार्ग, रेल्वे कोचेस, डेपो बांधकाम इत्यादी | १३,८३६ |
| २ | पुनर्वसन व पुनर्वसाहत | ९१ |
| ३ | खाजगी जमीन संपादन | ४९९ |
| ४ | **एकूण पायाभूत किंमत (१ ते ३ ची बेरीज)** | **१४,४२६** |
| ५ | सर्वसाधारण सेवा व संरेखन शुल्क (G.C. & Design Charges) | ७२७ |
| ६ | प्रशासकीय खर्च | ५९३ |
| ७ | आकस्मिक निधी (Contingency) | ७०२ |
| ८ | **एकूण खर्च (४ ते ७ ची बेरीज)** | **१६,४४८** |
| ९ | बांधकाम कालावधी दरम्यान किंमतीत होणारी वाढ (Escalation) | ३,५०४ |
| १० | बांधकाम कालावधी व्याज ( IDC) | १,०१९ |
| ११ | कमीटमेंट चाजेस(Commitment Charges)/ फ्रंट एन्ड फी (Front End Fee) | ११६ |
| १२ | केंद्र स्तरीय कर (Central Taxes) | २,०४९ |
| | **प्रकल्प पूर्णत्व किंमत (८ ते १२ ची बेरीज)** | **२३,१३६** |

*(टीप- वरील प्रकल्प खर्चात राज्यस्तरीय/स्थानिक करांची एकूण रक्कम रु. ८०६ कोटी समाविष्ट नाही. )*

---

## परिशिष्ट-२

**मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाची अंमलबजावणीसाठी स्थापन करावयाचे विशेष हेतू वाहन (SPV)**

केंद्र शासनाच्या केंद्रीय शहर विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक K-14011/36/2009-Metro/MRTS-II (Vol.III), Dated 18 July, 2013 अन्वये सदर प्रकल्पासाठी संस्थात्मक व्यवस्था म्हणून राज्य शासनाने यापूर्वी स्थापन केलेल्या "मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड" या विशेष हेतू वाहन (SPV) कंपनीचे केंद्र व राज्य शासनाचा प्रत्येकी ५०% समभागअसलेल्या SPV मध्ये रुपांतर करुन या SPV मार्फत सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करावयाची आहे. सदर SPV कंपनीचे पदसिध्द अध्यक्ष हे सचिव, शहर विकास मंत्रालय, भारत सरकार असतील, त्या व्यतिरिक्त केंद्र शासन ४ संचालकाच्या नेमणुका करेल व राज्य शासन व्यवस्थापकीय संचालक व ४ इतर संचालकांची नेमणूक करेल. या नामनियुक्त संचालकांव्यतिरिक्त सदर SPV कंपनीच्या संचालक मंडळाने फंक्शनल डायरेक्टर हे केंद्र शासनाच्या सूचनेनुसार नियुक्त करावयाचे आहेत.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनची प्रशासकीय रचना, अधिकारी व कर्मचारी नेमणूक, स्वतंत्र कार्यालय, कायदे व विनियम इत्यादी दिल्ली मेट्रो रेल महामंडळ (DMRC) व इतर मेट्रो रेल महामंडळांच्या धर्तीवर असेल. सदर महामंडळाचे कामकाज केंद्र सरकारच्या नियम व अटीनुसार करावयाचे आहे.

---

## परिशिष्ट-३

**केंद्र शासनाच्या मान्यतेप्रमाणे प्रकल्पासाठी निधी उभारण्याचे स्वरुप**

| **निधी उभारणीचा तपशिल** | **रुपये कोटीत** |
|---|---|
| केंद्र शासनामार्फत समभाग | २४०२.७ (१०.४%) |
| राज्य शासन/मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत समभाग. | २४०२.७ (१०.४%) |
| केंद्र शासन यांच्यामार्फत केंद्रीय कर/शुल्क याकरीता दुय्यम कर्ज *(५०% हिस्सा) | १०२४.५ (४.४%) |
| राज्य शासन यांच्यामार्फत केंद्रीय कर* (५०% हिस्सा) तसेच खाजगी जमीन संपादन व पुनर्वसनासाठी दुय्यम कर्ज # | १६१५.१ (७%) |
| मालमत्ता विकास, परिणाम शुल्क (Impact fee) / सुधारणा कर(Betterment Tax) मधून जमा करावयाचा निधी | १००० (४.३%) |
| भागधारकाकडून अर्थसहाय्य (MIAL) | ७७७ (३.४%) |
| ASIDE योजनेअंतर्गत अर्थसहाय्य / एम.एम.आर.डी.ए. कडून अनुदान | ६७९ (२.९%) |
| जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून कर्ज | १३,२३५ (५७.२%) |
| **@ एकूण** | **२३,१३६ (१००%)** |

**टीप-** * *केंद्रीय कर* (Custom & Excise, IT, Corporate Tax)

*# खाजगी जमीनीचे संपादन व पुनर्वसन खर्चासहीत*

*@ सदर एकूण निधी उभारणीच्या तपशीलात राज्यशासनाने सोसावयाच्या राज्यस्तरीय/स्थानिक करांची एकूण रक्कम रु. ८०६ कोटी समाविष्ट नाही.*

------

## परिशिष्ट-४

### मुंबई मेट्रो रेल्वे मार्गिका-३ करिता संकल्पित प्रवासी भाडे

मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-३ ची संकल्पित भाडेरचना दिल्ली मेट्रोच्या रेल्वेच्या भाडेदरानुसार खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे राहील-

**मुंबई मेट्रो लाईन-३ करिता सन २०२१ चा संकल्पित भाडे तक्ता**
**(DMRC भाडे दर २०१३ च्या धर्तीवर)**

| अंतर (कि.मी.) | ०-२ | २-४ | ४-६ | ६-९ | ९-१२ | १२-१५ | १५-१८ | १८-२१ | २१-२४ | २४-२७ | २७-३१ | ३१-३५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भाडे (रु.) | १२ | १४ | १७ | २२ | २३ | २५ | २८ | ३० | ३१ | ३४ | ३६ | ३९ |

सदर मेट्रो रेल्वेच्या भविष्यातील भाडयाचे दर मेट्रो रेल्वे (सुधारीत) कायदा २००९ नुसार "Fare Fixation Committee" मार्फत निश्चित करण्यात येतील.

------

## परिशिष्ट-५

### मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर उभारावयाचा समर्पित नागरी परिवहन निधी (Dedicated Urban Transport Fund)

केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाच्या भाग भांडवलासाठी मालमत्ता विकास (Property Development) /परिणाम शुल्क (Impact Fee)/सुधारणा शुल्क (Betterment Charges) इत्यादी मधून रु.१००० कोटी निधीची उभारणी व नागरी परिहवन प्रकल्पासाठी समर्पित निधीची उभारणी करणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील स्त्रोतांच्या उत्पन्नातून एक समर्पित "नागरी परिवहन निधी" स्थापन करण्यास शासनाची तत्वत: मान्यता आहे:-

I. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करून त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

   या संदर्भातील तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ठ करण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे स्वतंत्रपणे करण्यात येईल.

II. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क शासन अधिसूचित करेल असे "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प"

राबविण्यात येणाऱ्या शहरात १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यात तरतूद करणे व त्यानुसार वसूल होणारी वाढीव रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

III. शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" राबविण्याचे अधिसूचित केल्यास महानगरपालिका क्षेत्रात मुंबई मुंद्राक अधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यावरील संलेखावर बसवायच्या मुद्रांक शुल्कासोबतच जमीनी व इतर स्थावर मालमत्तेचे विक्री किंवा देणगीच्या बाबतीत अशा रितीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मुल्यांवर व फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाद्वारे सुरक्षित रक्कमेवर १% अधिभार लावण्याची तरतूद मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये करुन अशा प्रत्यक्ष जमीनी व इतर स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण संलेखाच्या नोंदणीच्या वेळी सदर अधिभाराची रक्कम संबंधित जिल्हा सहनिबंधकांनी/दुय्यम निबंधकांनी वसूल करणे व शासनाने यामाध्यमातून वसूल झालेल्या रक्कमेएवढे अनुदान दरवर्षी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देणे.

IV. मेट्रो स्टेशन व कार डेपोंच्या जागांच्या व्यावसायिक विकसनाद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे. तसेच आरे डेपो लगतची अतिरिक्त तीन हेक्टर जागा सदर प्रकल्पाकरीता उपलब्ध करुन घेऊन सदर तीन हेक्टर जागेवर शासन मंजूर करेल अश्या वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत मालमत्ता विकास करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रकल्पासाठी निधी उभारणे.

या संदर्भातील तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ठ करण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे स्वतंत्रपणे करण्यात येईल.

V. मेट्रो रेल्वे स्टेशनवरील जाहिरात व पार्कींगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे.

सदर विविध स्त्रोतातून प्राप्त होणारा निधी हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर वर उल्लेखित समर्पित "नागरी परिवहन निधीमध्ये" ठेवण्याचे संकल्पित असून त्याचा विनियोग सदर मेट्रो प्रकल्पासाठी राज्यशासनाच्या वतीने समभागाची रक्कम सदर SPV कडे वर्ग करण्याकरिता तसेच SPV ला कर्जाच्या परतफेडीसाठी निधी अपूरा पडत असल्यास पूरक निधी देण्याकरीता करण्याचे नियोजित आहे. सदर कर्ज परतफेडीसाठी समर्पित "नागरी परिवहन निधी" कमी पडल्यास इतर स्त्रोतांतून त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) ने निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

---

**METROLIN-3GR03032014**